(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जावक क्र.मजीप्रा- १०९९/बैठक/८६/आ-४

दिनांक ११/२/२०००

**विषय** :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या , बुधवार दिनांक २/२/२००० रोजी झालेल्या ८६ व्या बैठकीचे इतिवृत्त.

बुधवार, दिनांक २/२/२००० रोजी , झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८६ व्या वैठकीच्या कार्यक्रम बार्बीवर चर्चा झाली. या बैठकीचे कार्यक्रम बाबवार इतिवृत्त तयार करण्यांत आले आहे, त्यास मंजुरी मिळावी, ही विनंती.

सोबत: इतिवृत्ताचे प्रारूप

विजयकुमार अग्रवाल 11/2/00

( विजयकुमार अग्रवाल )
**सदस्य सचिव (प्रशासन)**

**मा.मंत्री,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**
**तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष,**

5/3

6/3/2000

टपालात

सस (प्र.)

7/3/00

6/3

इतिवृत्ताची प्रत सर्वसंबंधितांना कार्यवाहीसाठी पाठवावी

383
9/2/2000

7/3

आ.अ (प्र)

7/3

के.अ. (आ-४)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८६ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८६ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा. श्री. आर.आर. पाटील, यांच्या अध्यक्षतेखाली दि.२ फेब्रुवारी,२००० रोजी संपन्न झाली. या बैठकीस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री.आर.आर.पाटील,मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष
२) ॲड.श्रीमती सुलेखा कुंभारे, मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
३) श्री.सुनिल तटकरे, मा.राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
४) श्री.व्ही.पी.राजा,सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
५) श्री.विद्याधर कानडे,सचिव,वित्त विभाग
६) श्री.शहजाद हुसेन,सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग
७) श्री.विजय कुमार अग्रवाल,सदस्य सचिव(प्रशासन),म.जी.प्रा.,मुंबई

या व्यतिरिक्त खालील विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१) श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
२) श्री.शे.दौ.अरमाळ,विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नवी मुंबई
३) श्री.स.रा.बागल,वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
४) श्री.अ.ना.अळवणी,मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,ठाणे
५) श्री.बी.एस.पाटील,उप मुख्य लेखा अधिकारी(१),म.जी.प्रा.,नवी मुंबई
६) श्री.बी.सी.हंगे,उप मुख्य लेखा अधिकारी(२),म.जी.प्रा.,नवी मुंबई
७) श्री.नि.कृ.माडा,मुख्य प्रशासकीय अधिकारी,म.जी.प्रा.,मुंबई
८) श्री.मिलिंद केळकर,अधीक्षक अभियंता(समन्वय),म.जी.प्रा.,मुंबई
९) श्री.जी.सी.शर्मा,अधीक्षक अभियंता,म.नि.सं.व सं.,म.जी.प्रा.,नवी मुंबई
१०) श्री.बी.टी.कांबळे,अधीक्षक अभियंता,गुण परिक्षण,म.जी.प्रा.,नवी मुंबई
११) श्री.पी.के.सोनाग्रा,अधीक्षक अभियंता(मुख्यालय),म.जी.प्रा.,नवी मुंबई
१२) श्री.एन.एन.महाजन,अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.प्रकल्प मंडळ,ठाणे
१३) श्री.आर.एन.देशपांडे,कार्यकारी अभियंता,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई
१४) श्री.पारखी,कार्यकारी अभियंता,मोरबे धरण
१५) श्री.श.रं.शिरवळकर,अवर सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
१६) श्री.ल.पा.कालिबाग,उप सचिव,ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

....२....

सुरवातीस सदस्य सचिव(प्रशासन) यांनी नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर नवीन अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली ही पहिलीच सभा होत असल्याने मा.अध्यक्ष व दोन्ही मा.उपाध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तद्नंतर मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांच्या परवानगीने प्रस्तावित कार्यक्रम बाबींवर चर्चेस सुरवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८५ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी इतिवृत्ताबाबत कोणास काही बदल सुचवावयाचे आहेत काय अशी विचारणा केली. तथापी, कोणीही आक्षेप न घेतल्याने दि.२९ सप्टेंबर,१९९९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२९/९/१९९९ रोजी झालेल्या ८५ व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कार्यवाही.**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी कार्यक्रम बाब क्र.२ मध्ये प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेत चर्चील्या गेलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रम बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर केला आहे हे स्पष्ट केले. सदर कार्यक्रम बाबीसोबत जोडलेल्या तक्त्यातील प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेतील कार्यक्रम बाब क्र.२ वर चर्चा करीत असताना मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी गेल्या सभेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयांना झेरॉक्स मशिनचा पुरवठा करण्याची कार्यक्रम बाब सादर केली होती व ही कार्यक्रम बाब प्रलंबित ठेवण्यात आली होती याकडे लक्ष वेधून प्राधिकरणाच्या प्रत्येक विभागीय कार्यालयांना खरोखरच झेरॉक्स मशिनचा पुरवठा करण्याची आवश्यकता आहे काय अशी विचारणा केली. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, प्राधिकरणात क्षेत्रीय कार्यालयांना एकत्रित सुमारे ८० झेरॉक्स मशिन्स् घ्यावी लागणार आहेत. हा आकडा काढताना एका इमारतीत २ कार्यालये असल्यास अशा ठिकाणी फक्त एकच झेरॉक्स मशिन पुरविण्याचा विचार करण्यात आला आहे. यावर मा.मंत्री महोदयांनी असे सूचित केले की, झेरॉक्स मशिन एकाच वेळी सर्व कार्यालयांसाठी न घेता टप्प्या-टप्प्याने ती घेण्यात यावीत व पहिल्या टप्प्यात प्रथमत: ज्या क्षेत्रीय कार्यालयांना झेरॉक्स मशीनची तातडीची गरज आहे अशा ४० कार्यालयांना झेरॉक्स मशिनचा पुरवठा करण्यात यावा. झेरॉक्स् मशीनच्या गरजेबाबत असे सांगण्यात आले की, वेगवेगळ्या प्रकारची माहिती सतत क्षेत्रीय कार्यालयांकडून बोलाविली जाते व त्यामुळे झेरॉक्स प्रती काढण्याचे काम भरपूर आहे. याबाबत मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा

प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांनी असे सुचविले की, क्षेत्रीय कार्यालयाकडून दरमहा झेरॉक्ससाठी किती खर्च करावा लागतो त्याची माहिती गोळा करावी व झेरॉक्स मशिन नवीन घेण्यासाठी करावा लागणारा भांडवली खर्च व प्रत्यक्षात सध्या झेरॉक्स मशिनवर होणारा खर्च याची तुलना करण्यात यावी.

याच कार्यक्रम बाबीवर चर्चा करताना मागच्या सभेतील कार्यक्रम बाब क्र.४ वर चर्चा करताना अमरावती येथील विभागीय कार्यालयासाठी प्राधिकरणाच्या इमारती बांधण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सादर करण्यात आली आहे असे सांगण्यात आले. याबाबत असा मुद्दा उपस्थित करण्यात आला की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रत्नागिरी, अमरावती,नागपूर अशा काही ठिकाणी प्राधिकरणाच्या मालकीच्या कार्यालयीन इमारती बांधण्यास मंजुरी दिली असून त्याप्रमाणे कामास सुरवात झाली आहे. अशा इमारती पाणी पुरवठा केंद्रांच्या आवारात असल्याने योजनांतर्गतची कामे पूर्ण झाल्यानंतर योजना हस्तांतरीत होताना या इमारतींबाबत वाद निर्माण होऊ शकेल. याबाबत असा खुलासा करण्यात आला की, सदर इमारती प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेवर व प्राधिकरणाच्याच खर्चाने बांधलेल्या असल्यामुळे त्यांच्या बाबतीत वर उल्लेख केलेला प्रश्न उद्‌भवणार नाही.

तद्‌नंतर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात राबविल्या जात असलेल्या नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी लागणारे सिमेंट कंत्राटदाराने आणावे याबाबत मागील सभेत सादर झालेली कार्यक्रम बाब आज होत असलेल्या सभेत कार्यक्रम बाब क्र.१६ अन्वये पुन्हा सादर केली आहे असे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले. मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता, यांनी याबाबत असा मुद्दा उपस्थित केला की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास लागणारे सिमेंट प्राधिकरणाने विकत घेवून कंत्राटदारांस दिले तर ते एका ठराविक दराने कंत्राटदारास प्राप्त होत असल्याने ठेकेदाराचे निविदेसाठी प्राप्त होणारे देकार हे त्याबाबतचा विचार करुन दिले जातात. त्या उलट खुल्या बाजारातून कंत्राटदाराने सिमेंट विकत घ्यावयाचे ठरले तर बाजारभावात होणारा फरक विचारात घेवून कंत्राटदार निविदेसाठी देकार सादर करतील व त्यामुळे प्राधिकरणास जास्त खर्च करावा लागण्याची शक्यता आहे.

याबाबत असा खुलासा करण्यात आला की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे सध्या पाटबंधारे खात्याने केलेल्या दर करारानुसारच सिमेंटची खरेदी करण्यात येते. याबाबत सर्वसाधारणपणे अनुभव असा आहे की, ज्या वेळी बाजारात सिमेंटची मागणी कमी असते (म्हणजे पावसाळ्यात) त्यावेळी कंपन्या मोठया प्रमाणात सिमेंटचा पुरवठा प्राधिकरणास करतात, ज्यामुळे असे प्राप्त झालेले सिमेंट साठवून ठेवणे व विशेषत: पावसाळा असल्यामुळे त्याची काळजी घेणे प्राधिकरणास भाग पडते. याच कारणांमुळे काही प्रमाणात सिमेंट खराब होणे व वाया जाणे या सारख्या गोष्टींनाही तोंड दयावे लागते. आता प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे नागरी पाणी

पुरवठा योजनांसाठी देखील जर सिमेंटचा पुरवठा ठेकेदाराने केला तर ठेकेदार कामांवर ज्या प्रमाणात सिमेंट लागेल त्याप्रमाणात ते त्या-त्या वेळी विकत घेवून वापरतील ज्यामुळे १) ठेकेदारास सिमेंट खरेदीपोटी मोठया प्रमाणात गुंतवणूक करावी लागणार नाही.(ज्याचा परिणाम देकारावर होईल) व २) प्राप्त होणारे सिमेंट हे ताजे(फ्रेश) असेल ज्यामुळे कामाची गुणवत्ता चांगली राखणे शक्य होईल.

याबाबत सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी असे सांगितले की, आज होत असलेल्या सभेतील बाब क्र.१६ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सिमेंट पुरवठा केला तर होणारे फायदे व तोटे तसेच तेच काम कंत्राटदारांवर सोपविले तर होणारे फायदे व तोटे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. दोन्ही प्रकारच्या पध्दतीमध्ये काही तोटे व काही फायदे आहेत. परंतू सर्वसाधारणपणे सिमेंटच्या गुणवत्तेबाबत उद्‌भवणाऱ्या अडचणी कंत्राटदारास पुढे करता येवू नयेत व ज्या धर्तीवर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी योजनांतर्गत सर्व कामांची एकत्रित एकच निविदा, सदर कामासाठी लागणाऱ्या सर्व बांधकाम साहित्य सामुग्रीच्या पुरवठयासह काढली जाते त्याचप्रमाणे नागरी पाणी पुरवठा योजनासाठी देखील सिमेंटचा पुरवठा कंत्राटदारासच करावयास सांगणे श्रेयस्कर ठरेल. वरीलप्रमाणे चर्चा झाल्यावर चालू सभेतील कार्यक्रम बाब क्र.१६ नुसार प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे यापुढे ज्या नागरी पाणी पुरवठा योजनांच्या निविदा मागवावयाच्या आहेत त्यामध्ये सिमेंटचा पुरवठा ठेकेदाराने करण्याची अट घालण्यात यावी या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

केलेल्या कार्यवाहीतील अनु.क्र.५ बाबत चर्चा करताना मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता व मा.राज्यमंत्री,नगर विकास,मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी शासनाच्या पाणी पुरवठा विभागाने ५ वर्षात केलेल्या कामांसंबंधी केलेल्या जाहिरातीसाठी केलेल्या खर्चास प्राधिकरणाने मान्यता दिल्याचे पाहून त्याबाबत कोणत्या कामाच्या जाहिरातीतून किती पैसे मिळाले होते व त्याचा उपयोग दुसऱ्या जाहिरातीत कसा करण्यात आला होता याबाबत विचारणा केली. त्याबाबत असा खुलासा करण्यात आला की, फेब्रुवारी महिन्यात महाराष्ट्र शासनाने एका खास पुरवणीव्दारे ५ वर्षात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने केलेल्या कार्यास प्रसिध्दी दिली होती. या पुरवणीसाठी पाणी पुरवठा क्षेत्रासाठी कामे करणारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद तसेच भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांच्यातर्फे कामे करत असलेल्या वेगवेगळया ठेकेदारांकडून शुभेच्छा जाहिराती देण्यात आल्या होत्या. या जाहिरातीमधून प्राप्त होणारा अपेक्षित निधी हा मराठीतील पुरवणीसाठी पुरेसा तर होताच त्या शिवाय अतिरिक्त निधी शिल्लक राहणार होता व या अतिरिक्त निधीमधून मार्च,१९९९ मध्ये तशाच प्रकारची एक पुरवणी इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे प्रस्तावित होते. प्रत्यक्षात भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमध्ये कामे करणाऱ्या ठेकेदारांकडून अपेक्षे इतक्या जाहिराती प्राप्त न झाल्याने मार्चमध्ये प्रसिध्द केलेल्या पुरवणीपोटी झालेल्या खर्चापेक्षा

....५....

उपलब्ध निधी रु.६,६१,५३९/- कमी पडला. त्यामुळे याबाबत शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या आदेशानुसार सदर रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संबंधितांस अदा केली व त्यास प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेत कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.

याबाबत चर्चा करीत असताना सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी फेब्रुवारी व मार्च मध्ये प्रसिध्द केलेल्या दोन्ही पुरवण्यांच्या प्रती मा.अध्यक्ष व मा.दोन्ही उपाध्यक्ष यांना सादर केल्या.

त्यानंतर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी मागील सभेतील उर्वरित कार्यक्रम बाबीवर करण्यात आलेली कार्यवाही वाचून दाखविली व त्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :- हुडकोकडून ग्रामीण पाणी पुरवठयासाठी कर्ज उभारणीसंबंधी म.जी.प्रा.ने. घेतलेल्या निर्णयास मान्यता देणे.**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी हुडको या संस्थेकडून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी रु.२०० कोटीचे कर्ज घेण्याबाबतचा प्रस्ताव असून या प्रस्तावास प्रथमत: प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करुन घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतर त्यास शासनाची व त्यानंतर शासनाच्या उच्चाधिकार समितीची मान्यता घ्यावी लागणार असल्याचेही सांगण्यात आले. या कर्जासाठी ज्या भागात पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेत अडचणी आहेत अशा भागातील सुमारे २९ योजना विचाराधीन आहेत असे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सांगितले. याबाबत चर्चा करीत असताना मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी असे सूचित केले की, प्रगतीपथावरील नागरी पाणी पुरवठा योजनांचा देखील यासाठी विचार करण्यात यावा कारण अशा योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला पुरेसा निधी प्राधिकरणाकडे उपलब्ध नाही. सदस्य सचिव(प्रशासन) यांनी याबाबत खुलासा केला की, प्रगतीपथावरील १९ नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्याचा प्रस्ताव स्वतंत्रपणे करण्यात येत असून आता चर्चिल्या जात असलेल्या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात येत असलेला प्रस्ताव हा फक्त ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठीच आहे. याबाबत मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी असे सूचित केले की, दूषित पाण्याचा स्त्रोत असलेल्या योजनांचा विचार करीत असतानाच हुडकोकडून घ्यावयाच्या कर्जामध्ये ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांमध्ये १००% टँकरग्रस्त गावांचा समावेश आहे अशा योजनांचाही विचार व्हावा.

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी याबाबत असा खुलासा केला की, ज्या २९ ग्रामीण पाणी पुरवठा योजना हुडकोकडून घ्यावयाच्या कर्जासाठी विचाराधीन आहेत त्या योजनांची किंमत हुडकोकडून प्राप्त व्हावयाच्या कर्जापेक्षा बरीच जास्त आहे आणि हुडकोकडून सध्या फक्त रु.२०० कोटीच उपलब्ध होण्याची शक्यता असल्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे आणखी काही योजनांचा

विचार करणे सध्या तरी शक्य नाही. याबाबत सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी असे सूचित केले की, सध्या विचाराधीन असलेल्या २९ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे (दूषित स्त्रोत असलेल्या योजना) प्रस्ताव पुढे पाठवावेत म्हणजे त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू होईल व नंतर वर सूचित केल्याप्रमाणे इतर योजनांसाठी हुडकोकडून कर्ज मिळण्याची शक्यता असल्यास पुढे भविष्यात त्याचा विचार व्हावा.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर कार्यक्रम बाब क्र.३ मध्ये प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की,

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हुडकोकडून रु.२०० कोटीचे कर्ज घ्यावे व त्यासाठी शासनाची हमी मिळवावी, तसेच शासनाने मुद्दलाची परतफेड व व्याजाची अदायगी इत्यादी बाबींची संपूर्ण जबाबदारी स्वीकारुन यासाठी नियमितपणे अर्थसंकल्पात तरतूद करावी.

अशा रितीने वरीलप्रमाणे निधी/कर्ज उभारत असताना त्या संदर्भात जी काही कार्यवाही करणे आवश्यक आहे किंवा ज्या काही बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे, जसे विविध प्रकारचे करार करणे इत्यादी, त्यासाठीचे सर्व अधिकार सदस्य सचिव(प्रशासन व बाहय अर्थसहाय्य) यांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.४:-बृहत आराखडयाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा योजनांचा प्रगती अहवाल.**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी या कार्यक्रम बाबीवर चर्चा करण्यापूर्वीच हे स्पष्ट केले की, सदर कार्यक्रम बाब ही फक्त माहितीसाठी सादर करण्यात येत आहे. त्यांनी याबाबत सांगितले की, प्रगतीपथावर असलेल्या ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी प्राधिकरणास सुमारे रु.४८६८ कोटी निधीची आवश्यकता आहे. तथापी, दि.१५ जानेवारी,२००० पर्यंत प्राप्त झालेला निधी हा फक्त रु.६२७.८२ कोटी असून प्रगतीपथावरील कामांसाठी तो अत्यंत अपुरा आहे. त्यामुळे निधी उपलब्धततेबाबत तातडीने विचार करण्याची गरज आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, केंद्र शासनाने लागू केलेली सुधारित मार्गदर्शक तत्वे राज्य शासनाने अद्याप स्वीकृत केलेली नाहीत. बाहय अर्थसहाय्यासाठी प्रस्तावित असलेल्या सर्व योजनांच्या बाबत देखील जागतिक बँक/ डी.एफ.आय.डी./के.एफ.डब्ल्यू./डॅनिश सरकार या सारख्या बाहय अर्थसहाय्य देणाऱ्या संस्था देखील सुधारित मार्गदर्शक तत्वानुसारच योजना आखण्याची अट घालत आहेत आणि

त्यामुळेच या स्त्रोतांमधून देखील निधी प्राप्त होणे हे सर्वस्वी केंद्र शासनाचे नवीन मार्गदर्शक तत्वे राज्य शासनाने स्वीकृत करण्यावरच अवलंबून आहे. याबाबत मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी वरील सर्व बाबी शासनाच्या धोरणाशी निगडित असल्याने प्रथमत: शासनाचे धोरण जाहीर झाल्यानंतर याबाबत विचार करणे योग्य ठरेल असे सूचित केले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.५:-पाणी पुरवठा योजनांच्या कामाच्या निविदा बोलावण्यात आल्या परंतु, मंजुर केल्या नाहीत याबाबतची सद्यस्थिती.</u>**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले की, कार्यक्रम बाबीतील प्रपत्र १ मध्ये राज्यातील २८ जिल्हयांमधील एकूण २५० योजनांच्या एकूण रु.१६२६ कोटी किंमतीच्या कामांच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्याची जिल्हावार माहिती प्रपत्रात दिली आहे. मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी याबाबत असे सूचित केले की, प्रगतीपथावरील योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती बघता ज्या योजनांबाबत निविदा स्वीकृतीचा निर्णय अद्याप घेतलेला नाही अशा एकूण रु.१६२६ कोटी किंमतीच्या कामांच्या निविदा स्वीकृत करावयाच्या किंवा नाहीत याचा निर्णय शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून निधीच्या उपलब्धततेबाबत होकारार्थी संकेत दिल्यानंतरच घेणे योग्य ठरेल. याबाबत मा.राज्यमंत्री,नगर विकास , यांनी ज्या २५० कामाच्या निविदा प्राधिकरणाकडे वेगवेगळया स्तरावर विचाराधीन आहेत त्यांची सविस्तर यादी सादर करावी असे सूचित केले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.६:-पाणी पुरवठा योजनांच्या कामाच्या निविदा मंजुर केल्या परंतु कामाचे आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत याबाबतची सद्यस्थिती.</u>**

या कार्यक्रम बाबीव्दारे ज्या निविदा दि.८ जून,१९९९ रोजी किंवा त्यानंतर स्वीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्याबाबतची माहिती देण्यात आली असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, शासनाकडून याबाबत असे आदेश प्राप्त झाले आहेत की, ज्या निविदा स्वीकृतीचे निर्णय घेण्यात आले आहेत अशा निविदांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येवू नये तसेच स्वीकृत करण्यात आलेल्या ज्या निविदांचेबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत अशा निविदांचेबाबत देखील प्रत्यक्षात कामे सुरु करण्यात येवू नयेत. वरील शासन आदेश सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले असून दि.८ जून,१९९९ रोजी किंवा त्यानंतर कोणत्याही नवीन कामास सुरुवात करण्यात आलेली नाही अथवा कोणत्याही नवीन कामासाठी निविदा मागविण्यात येत नाहीत. याबाबत फक्त ज्या पाणी पुरवठा योजना 'पूर्णठेव तत्वावर' राबविण्यात येत आहेत अशा योजना तसेच जी ४३ पाणी पुरवठा केंद्रे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे चालविण्यात येत आहेत त्या पाणी पुरवठा योजना केंद्राच्या संबंधित देखभाल दुरुस्तीच्या कामाच्या निविदांचा अपवाद करण्यात आला आहे. मा.मंत्री,पाणी पुरवठा व

स्वच्छता,यांनी याबाबत असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या नुकत्याच झालेल्या अमरावती, अकोला येथील दौऱ्याच्या वेळी अकोट व ८४ गावांच्या पाणी पुरवठा योजनांच्या निविदा मागविण्याचे आदेश क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत, त्याचा देखील प्रस्तावित प्रकरणी अपवाद करण्यात यावा. सदर योजनेबाबत त्यांनी असेही स्पष्ट केले की, अकोट शहरास या योजनेमधून पाणी पुरवठा करता येईल अशा तऱ्हेने उपांगाची संकल्पना करण्यात यावी. परंतू प्रत्यक्षात शहरी भागाच्या कोणत्याही कामांचा समावेश सदर निविदेत करु नये. कारण याबाबत संबंधित नगरपालिकेने आवश्यक तो ठराव दिलेला नाही.

## कार्यक्रम बाब क्र.७:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन १९९७-९८ चा लेखा परिक्षण अहवाल.

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी या कार्यक्रम बाबीवर चर्चा करताना सांगितले की, १९९७-९८ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही पटलावर सादर करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम बाबीस मा.अध्यक्ष यांच्यासह प्राधिकरणाच्या ७ सदस्यांनी सर्क्युलेशनव्दारे मंजुरी दिली होती.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात आली.

## कार्यक्रम बाब क्र.८:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सध्याची आर्थिक परिस्थिती.

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले की, १९९९-२००० या वर्षात वेगवेगळया स्त्रोतामधून एकूण रु.१००२.२६ कोटी निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे या वर्षी पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी मागील वर्षी (म्हणजेच १९९८-९९) कर्जरोख्याव्दारे उपलब्ध केलेल्या निधीतील दि.१ एप्रिल,१९९९ रोजी शिल्लक असलेला रु.५३९.०६ कोटीचा विचार करता एकूण रु.१५४१.३२ कोटी खर्चासाठी उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे. त्यापैकी आत्तापर्यंत मंजूर नियतव्ययापैकी फक्त रु.६२७.८२ कोटी उपलब्ध झाल्याचे त्यांनी सांगितले. दि.१५ जानेवारी,२००० पर्यंत नागरी पाणी पुरवठा योजनांवर रु.२९१.२७ कोटी, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी रु.७३८.३२ कोटी, कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते व अनुषंगीक खर्चासाठी रु.१२४.७२ कोटी, वीजेची देयके अदा करण्यासाठी रु.३०.६५ कोटी आणि आयुर्विमा महामंडळाच्या/खुल्या बाजारातील कर्जाच्या परतफेडीपोटी रु.७५ कोटी असे एकूण रु.१२५९.९६ कोटी खर्च करण्यात आले आहेत.,असेही त्यांनी सांगितले.

निधी उभारणीबाबत सदस्य सचिव(प्रशासन) यांनी असे सांगितले की, कर्जरोखे मालिका क्र.५ व्दारे रु.२५० कोटी उभे करणे अपेक्षित होते परंतू प्रत्यक्षात फक्त रु.१६९ कोटी उभे करणे शक्य झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महाराष्ट जीवन प्राधिकरणास एकूण सुमारे

रु.६५७ कोटी येणे असल्याचे त्यांनी सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले. या थकीत रकमेपैकी सुमारे रु.३४३ कोटी फक्त १३ नगरपालिकांकडून/महानगरपालिकांकडून येणे असल्याचेही विशेषपणे नमूद करुन या थकबाकीच्या वसुलीपोटी प्राधिकरणाकडून करण्यात आलेले प्रयत्न देखील सांगण्यात आले. मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी याबाबत विचारणा केली की, थकबाकीच्या वसुलीसाठी सर्व मुख्य अभियंत्यांना सूचना दयाव्यात असे त्यांनी या आधीच सूचित केले होते , त्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे ? याबाबत सदस्य सचिव(प्रशासन) यांनी असे सांगितले की, दि.२४/१/२००० रोजी झालेल्या मुख्य अभियंत्यांच्या सभेत आवश्यक त्या सूचना मुख्य अभियंत्यांना दिल्या असून सदर सभेचे इतिवृत्त देखील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. ज्या नगरपालिका/महानगरपालिकांकडून मोठया रकमा देय आहेत त्यांची यादी बघता असे दिसते की, धुळे (रु.४९ कोटी),अकोला (रु.४५ कोटी) या महानगरपालिकांकडून सर्वात जास्त थकबाकी आहे. तर सर्वात कमी थकबाकी कराड नगरपालिकेकडे असून ती सुमारे रु.१२ कोटी आहे. या विषयावर चर्चा करताना असे सूचित करण्यात आले की, ज्या नगरपालिका/महानगरपालिकांची आर्थिक स्थिती चांगली आहे उदा.ठाणे, अशा महानगरपालिकांकडून वसुलीसाठी जास्त प्रयत्न करण्यात यावे. ठाणे महानगरपालिकेकडून रु.३४.६४ कोटी थकीत असले तरी त्याहून जास्त रक्कम प्राधिकरणाकडूनच त्यांना येणे आहे असा ठाणे महानगरपालिकेचा दावा आहे असे मुख्य अभियंता,कोकण विभाग, यांनी सांगितले. हा वाद मिटविण्यासाठी सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सदस्य सचिव तसेच ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची एक सभा लवकरात-लवकर घ्यावी व त्यातून मार्ग काढावा असे मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता ,यांनी सूचित केले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, ज्या १३ नगरपालिकांकडून मोठया रकमा थकीत आहेत त्यांना शासनाकडून ऑक्ट्रॉयपोटी जे अनुदान वितरित करण्यात यावयाचे आहे त्यामधून रु.५० कोटी मार्चपर्यंत सचिव,वित्त विभाग, यांनी उपलब्ध करुन दयावे. याबाबत सचिव,वित्त विभाग, यांनी असे सांगितले की, जकातीपोटी दयावयाच्या अनुदानातून एकूण रु.५० कोटी कपात करता येतील किंवा नाही याची शक्यता आजमावून पहावी लागेल व याबाबत जास्तीत-जास्त काय करता येईल याचा प्रयत्न करण्यात येईल. मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता, यांनी ज्या नगरपालिकांकडून मोठया रकमा पाणी पुरवठा देयकापोटी थकीत आहेत अशा नगरपालिकांची पाणी पुरवठा केंद्रे प्राधिकरणातर्फे चालविली जात असतील तर त्यांना पाणी बंद करण्याच्या नोटीसा देवून त्यानुसार कार्यवाही करावी असे सूचित केले.

मुख्य अभियंता,कोकण विभाग,ठाणे,यांनी तद्नंतर ठाणे महानगरपालिके संबंधित टेमघर पाणी पुरवठा केंद्राच्या हस्तांतरणाबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, या पाणी पुरवठा केंद्रातून ठाणे, भिवंडी, मिरा-भाईंदर आणि त्या परिसरातील सुमारे ३३ खेडयांना पाणी पुरवठा केला जातो. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने हाती घेतलेल्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण प्रकल्प टप्पा-१ अंतर्गत टेमघर पाणी पुरवठा केंद्र बांधण्यात आले असून त्या वेळी झालेल्या करारानुसार सदर पाणी पुरवठा केंद्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे चालविण्यात येत

आहे. सध्या ठाणे महानगरपालिकेने भिवंडी नगरपालिका व मिरा-भाईंदर नगरपालिका यांच्याशी याबाबत चर्चा केली असून दि.१ मार्च,२००० पासून टेमघर पाणी पुरवठा योजना ताब्यात घेणेबाबत चर्चा चालू आहे असेही त्यांनी सांगितले. सदर पाणी पुरवठा केंद्राव्दारे ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील सुमारे ३३ गावांना पाणी पुरवठा होत असल्याने याबाबत ठाणे जिल्हा परिषदेशी चर्चा झाली आहे काय अशी विचारणा मा.मंत्री महोदयांनी केली असता ठाणे महानगरपालिकेने जिल्हापरिषद क्षेत्रात विनाशुल्क पाणी पुरवठा करण्याची तयार दर्शविली आहे असे कळते असे सांगण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.९:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे वार्षिक लेखे १९९८-९९**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी या कार्यक्रम बाबीव्दारे १९९८-९९ या आर्थिक वर्षांचे वार्षिक लेखे सादर केले असल्याचे सांगितले. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, यांनी वार्षिक लेख्यातील महत्वाच्या जमा व खर्चाबाबतची आकडेवारी सविस्तर सांगितली व तद्नंतर या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

१) ठराव करण्यात येत आहे, १९९८-९९ या वर्षाचे लेखे स्वीकृत करण्यात यावेत.

२) असाही ठराव करण्यात येत आहे की, १९९८-९९ या वर्षांचे लेखे मंडळाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी अधिप्रमाणित करावेत.

३) तसेच असाही ठराव करण्यात येत आहे की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये, ज्यांच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी व सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने लेख्यांमध्ये करता येतील.

४) ठराव करण्यांत येतो की,

(एक) रु.१७८८.३७ लाख इतकी रक्कम घसारा निधीकडे विनियोजित करण्यात यावी.

(दोन) रु.३७८.२५ लाख इतकी रक्कम कर्ज निवारण निधीकडे विनियोजित करण्यात यावी.

**कार्यक्रम बाब क्र.१०:-महाराष्ट्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या संदर्भात सेवा निवृत्ती वेतन व इतर निवृत्ती लाभाच्या बाबतीत केलेल्या सुधारित तरतूदी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.**

५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी शासनाच्या सेवानिवृत्त निवृत्तीवेतन धारकांना व त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसा धारकांना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याच तरतूदी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना जशाच्या तशा लागू करणेबाबतचा प्रस्ताव सदर

कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे ज्या योजना राबविल्या जातात त्या योजनांवर करण्यात आलेल्या खर्चाच्या १७.५०% रक्कम आस्थापना व अवजारे खर्चापोटी प्राधिकरणास प्राप्त होते व अशा प्राप्त झालेल्या निधीमधूनच प्राधिकरणाचा सर्व कारभार चालविला जातो. या १७.५०% ची फोड खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | आस्थापना खर्चापोटी | १५% |
| २) | मध्यवर्ती कार्यालयाचा खर्च व लेखा परिक्षणापोटी | १% |
| ३) | निवृत्ती वेतनापोटी | १% |
| ४) | टी.ॲन्ड पी. खर्चापोटी | ०.५% |
| | **एकूण** | १७.५०% |

वरील विवरणावरुन हे लक्षात येईल की, सध्या निवृत्ती वेतनासाठी भांडवली खर्चाच्या १% रक्कम प्राधिरकणास प्राप्त होते. परंतू प्रत्यक्षात अनुभव असा आहे की, निवृत्ती वेतनात ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वाढ करावयाची असल्याने एकरकमी दयावयाची रक्कम तसेच यापुढे दरमहा दयावे लागणारे निवृत्ती वेतन हे या १% तरतूदीमधून भागविणे शक्य होणार नाही. ही तूट भरुन काढण्यासाठी त्यात १/२ % वाढ करण्याची गरज आहे असे सांगण्यात आले. याबाबत प्रस्तावित केल्याप्रमाणे निर्णय न घेतला गेला तर निवृत्ती वेतनापोटी प्रत्यक्ष प्राप्त होणाऱ्या रकमेपेक्षा जास्त निधी खर्च करावा लागेल व त्यामुळे प्रगतीपथावरील योजनांसाठी प्राप्त होणाऱ्या निधीतून सदर रक्कम वळती करावी लागेल व त्यामुळे त्याचा विपरित परिणाम प्रगतीपथावरील योजनांवर होईल हे स्पष्ट करण्यात आले. त्या अनुषंगाने ही बाब मंजूर करण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. याबाबत अशी विचारणा करण्यात आली की, इतर खात्यामध्ये उदा.सार्वजनिक बांधकाम /पाटबंधारे विभाग ,आस्थापना व अवजारे खर्चापोटी किती टक्के आकारणी करण्यात येते. याबाबत असा खुलासा करण्यात आला की, सर्वसाधारणपणे या दोन्ही खात्यांमध्ये २५% ते ३०% आस्थापना व अवजारे खर्चापोटी आकारणी करण्यात येते. म्हणजेच इतर खात्याच्या तुलनेत प्रस्तावीत करण्यात आलेले १८% कमीच ठरतील.

त्यानंतर आस्थापना व अवजारे खर्चातील निवृत्तीवेतना पोटी असलेली टक्केवारी १% वरुन १.५% करण्याचे म्हणजेच एकूण आस्थापना व अवजारे खर्च १७.५% वरुन १८.००% करण्याचे ठरले.

मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, ज्या योजनांची तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून करण्यात येते अशा योजनांच्या तपासणीपोटी प्राधिकरणाने आकारणी करुन त्यामधून आस्थापना व अवजारे खर्चाचा काही भाग मिळवावा. या मुद्याबाबत असा खुलासा करण्यात आला की, ज्या नगरपालिकांच्या विकास कामांना शासकीय अनुदान प्राप्त होते अशा, नगरपालिकांतर्फे कार्यान्वित करावयाच्या कामांची अंदाजपत्रके

....१२....

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन त्यास तांत्रिक मंजुरी दिली जाते व या मंजुरीपोटी आकारणी स्वतंत्रपणे केली जाते. अर्थात या कारणांसाठी केलेल्या आकारणीचा संबंध आस्थापना व अवजारे खर्चांशी नसल्यामुळे सदर कामापोटी प्राप्त होणारा निधी हा प्राधिकरणाच्या महसुली खाती जमा होतो.

प्राधिकरणास उपलब्ध होत असलेला निधी कमी आहे, ५व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील तसेच निवृत्तीवेतनावरील खर्च वाढत आहे तसेच ज्या पूर्ण केलेल्या योजना हस्तांतरित झाल्या आहेत पण त्या योजनांवर नियुक्त केलेले कर्मचारी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वीकृत न केल्याने त्यांच्या वेतनावर देखील प्राधिकरणास खर्च करावा लागत आहे या गोष्टींचा विचार करता यापुढे नवीन भरती न करणे योग्य राहील असे ठरले.

मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी प्राधिकरणातील मागासवर्गीयांचे अनुशेषाबाबतची माहिती सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या. तसेच काही कार्यालये बंद करणे शक्य आहे काय ते तपासण्याच्याही सूचना मा.मंत्री महोदयांनी दिल्या.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला.

**<u>ठराव :-</u>**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दि.१५/११/९९ चे शासन निर्णय क्र.निमवा-१०९९/३०२/सेवा-४, (२) क्र.सेनिसे-१०९९/३०३/सेवा-४, (३) क्र.सेनिवे-१०९९/३०४/सेवा-४, (४) क्र.सेनिवे-१०९९/३०५/सेवा-४, प्राधिकरणाच्या सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना व यापुढे निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू करावे व त्याप्रमाणे त्यांना सेवा निवृत्ती विषयक लाभ दयावेत.

अशा रितीने प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाचे लाभ देत असताना निवृत्ती वेतन योजनेवर तूट येऊ नये म्हणून खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) ई.टी.पी.आकार सध्या १७.५०% आहे. यातून होणाऱ्या खर्चाचा, विशेषत: पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतन व निवृत्ती वेतनामुळे होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचा आढावा घेऊन ई.टी.पी. आकार वाढविण्यासाठी योग्य तो प्रस्ताव करावा.

२) निवृत्ती वेतन खर्चासाठी १% ई.टी.पी.आकार पुरेसा नाही असे दिसून येते, तेंव्हा असा वाढवावा की, जेणेकरुन, निवृत्ती वेतनावरील खर्च त्यातून भागविता येईल. या वर्षी ई.टी.पी.आकारातून निवृत्ती वेतनासाठी हिस्सा १% वरुन वाढून १.५% करावा.

३) ई.टी.पी.आकारामध्ये सर्व प्रशासकीय खर्च सिमती करण्याच्या दृष्टीने नोकर भरतीबाबत (रिक्रुटमेंट) कांही मूलगामी विचार करण्यात यावा. कामकाजाचा व कार्यपध्दतीचा अभ्यास करुन कार्यपध्दती सुटसूटीत करणे इत्यादी, बाबी वापरुन प्रशासकीय खर्चावर नियंत्रण ठेवावे.

४) या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव(प्रशासन) यांना देण्यांत येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.११:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्रचनेमुळे प्रादेशिक विभागांतर्गत प्रादेशिक मुख्य अभियंता व क्षेत्रीय मंडळ कार्यालये नव्याने निर्माण करण्यांत आल्यामुळे पूर्वीच्या परिमंडळ कार्यक्षेत्रात सुधारणा व संख्येत वाढ करण्याबाबत.**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सदर कार्यक्रम बाब ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्रचनेमुळे प्रादेशिक विभागांतर्गत प्रादेशिक मुख्य अभियंता व क्षेत्रीय मंडळ कार्यालये नव्याने निर्माण करण्यात आल्यामुळे प्राधिकरणामधील वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या, जेष्ठता सूच्या, मानीव दिनांक,बदल्या इत्यादी आस्थापना विषयक बाबी हाताळण्याची कामे करणे सोयिस्कर व्हावे म्हणून सध्याच्या कार्यकक्षा बदलण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात आली असल्याचे सांगितले.

त्यांनी पुढे असेही सांगितले की, पूर्वी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे कार्यरत असलेल्या संबंधित अधीक्षक अभियंत्यांनाच परिमंडळीय अधीक्षक अभियंता म्हणून घोषित करण्यात आले होते व त्यांच्यामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांबाबत वर उल्लेख केलेल्या आस्थापना विषयक बाबी हाताळण्यात येत असत. तथापी,विभागीय स्तरावर मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयाची निर्मिती झाल्यानंतर तसेच काही जिल्हा स्तरावर अधीक्षक अभियंत्यांच्या कार्यालयाची निर्मिती झाल्यानंतर वरील आस्थापना विषयक बाबी हाताळणे अस्तित्वातील परिमंडळांना गैरसोयीचे होऊ लागल्यामुळे आता विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या अधीक्षक अभियंत्यांना परिमंडळीय अधीक्षक अभियंता म्हणून घोषित करण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे ६ परिमंडळीय अधीक्षक अभियंता घोषित केल्यामुळे वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांच्या आस्थापना विषयक बाबी हाताळणे अधिक सोयिस्कर होणार असल्याने व तशी कर्मचाऱ्यांचीच मागणी असल्यामुळे सदर प्रस्ताव सादर केला आहे असे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

....१४....

**<u>ठराव :-</u>**

प्राधिकरणांतर्गत परिमंडळ स्तरावरील गट 'क' संवर्गातील आस्थापना विषयक प्रकरणे प्रशासकीयदृष्टया सुलभपणे हाताळता यावीत म्हणून व नवीन आकृतीबंधाप्रमाणे प्राधिकरणामध्ये प्रादेशिक मुख्य अभियंता व क्षेत्रीय मंडळ कार्यालयांचा विस्तार झाल्याने पदांच्या संख्येत झालेली वाढ विचारात घेऊ न परिमंडळाच्या संख्येत वाढ करुन (सध्याच्या ४ परिमंडळांऐवजी ६ परिमंडळे) त्यांच्या सध्याच्या कार्यक्षेत्रातील बदल करण्यास प्राधिकरण मंजुरी देत आहे.

प्राधिकरणांतर्गत परिमंडळांच्या संख्येत वाढ करुन कार्यक्षेत्रात बदल करण्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्याचे अधिकार सदस्य सचिव(प्रशासन) यांना देण्यात येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र.१२:-म.जी.प्रा.मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांना, वैद्यकीय खर्चांच्या प्रतिपूर्ती संबंधात शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्र राज्य सेवा(वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ च्या नियमांत आकस्मिक उद्‌भवणाऱ्या २३ गंभीर आजारावर, तसेच, ५ गंभीर आजारावर खाजगी रुग्णालयात विशिष्टोपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात विहित केलेल्या, विहित वेतनगट व दरा संदर्भातील आदेश प्राधिकरणास लागू करण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आकस्मिक उद्‌भवणाऱ्या २३ आजारांवर तसेच ५ गंभीर आजारांवर खाजगी रुग्णालयात विशिष्टोपचार घेतले गेले असल्यास केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भातील आदेश प्राधिकरणास लागू करण्याबाबत सदर कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले. त्यांनी असेही सांगितले की, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे सध्याचे प्राधिकरणातील नियम हे शासन आदेशानुसारच आहेत. प्रस्तुत प्रकरणी प्रस्तावित करण्यात आलेली कार्यवाही ही शासनाच्या निर्णयानुसारच असल्यामुळे त्यास मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**<u>ठराव :-</u>**

१) राज्य शासनाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र.एमएजी.१०९९/प्र.क्र.४०/आरोग्य-३,दिनांक २९/७/९९ मधील आदेश प्राधिकरणाच्या आस्थापनेस लागू करण्यात येत आहे.

२) राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र.एमएजी.१०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य-३, दिनांक १/१२/९८ मधील आदेश प्राधिकरणाच्या आस्थापनेस लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>कार्यक्रम बाब क्र. १३:- मध्यवर्ती कार्यालय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयासाठी श्रेयस चेंबर्स,मुंबई-१, येथील हुडकोच्या मालकीच्या परंतू प्राधिकरणाकडे भाडे तत्वावर ताब्यात असलेली पहिल्या व तिसऱ्या मजल्यावरील अनुक्रमे ४०४० चौरस फूट व २८०१ चौरस फूट जागा भाडे तत्वांवर पुढेही चालू ठेवणेबाबत व या जागेचे माहे एप्रिल, ९८ पासूनचे भाडे अदा करणेबाबत.</u>**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयासाठी श्रेयस चेंबर्स येथे हुडकोच्या मालकीच्या इमारतीत प्राधिकरणाने भाडे तत्वावर घेतलेल्या पहिल्या व तिसऱ्या मजल्यावरील जागेचे भाडे देणे सदर जागा सध्या दुरुस्तीसाठी हुडकोच्या ताब्यात दिली असूनही पुढे चालू ठेवण्याबाबत ही कार्यक्रम बाब सादर करण्यात आली असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले.

या बाबत मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता, यांनी असे सूचित केले की, दुरुस्तीसाठी जागा मालकाच्या ताब्यात दिलेल्या कालावधीत जागेवरील भाडेकरु म्हणून हक्क कायम राखण्यासाठी अशा कालावधीतील भाडे देणे कायदयाने बंधनकारक आहे किंवा कसे व या बाबत कायदयातील तरतूदी काय आहेत हे बघून कायदयानुसार भाडेकरु म्हणून आपले हक्क कायम राहतील अशी कार्यवाही यावी. या अनुषंगाने जर कायदयानुसार भाडे न देता हक्क अबाधित राहणार असेल तर भाडे देण्यात येवू नये. परंतू कायदयानुसार भाडेकरु म्हणून हक्क अबाधित राहण्यासाठी जर भाडे देणे बंधनकारक असेल तर मात्र भाडे देण्याची कार्यवाही करावी असे ठरले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.१४:-मोरबे धरणाच्या कामास निधी उपलब्ध करुन देणेबाबत.</u>**

विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,यांनी या प्रकरणीची अधिक माहिती विषद केली. त्यांनी अशीही कल्पना दिली की, मुख्य सचिवांच्या स्तरावर दि.११ जानेवारी,२००० रोजी जी बैठक झाली, त्यावेळी धरणाच्या कामासाठी एकूण रु.३५ कोटी व टप्पा-३ प्रकल्पासाठी रु.१५ कोटी असे एकूण रु.५० कोटी उपलब्ध करुन देण्यासाठी (व त्यातील किमान आवश्यक एवढी रक्कम दि.३१ मार्च,२००० पर्यंत उपलब्ध होण्यासाठी) नवी मुंबई महापालिका ७०% व सिडको ३०% कर्ज घेण्यास तयार आहे काय, हे आजमावण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सर्व संबंधित यंत्रणांशी चर्चा करणार आहेत व तद्नंतर मुख्य सचिवांची पुढील बैठक होणार आहे.

धरणाच्या कामाबाबत असे स्पष्ट करण्यात आले की, निधी लगेच उपलब्ध झाला तरी देखील फक्त बोगदयाचेच काम या वर्षी पावसाळ्यापूर्वी पूर्ण करता येईल. घळभरणीचे काम मात्र ऑक्टोबर,२००० नंतरच सुरु करुन पूर्ण करणे शक्य होईल.

चर्चे अखेरीस अध्यक्षांनी असेही सांगितले की, ग्रामीण विकास विभागाकडून सिडकोरा देय असलेल्या निधीपैकी रु.१० कोटी मोर्बे धरणासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल.

**कार्यक्रम बाब क्र.१५:-नागरी/ग्रामीण पाणी पुरवठा योजना स्थानिक संस्थांकडे हस्तांतरणामुळे अतिरिक्त ठरलेले कर्मचारी यांचे समायोजनाबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या नागरी/ग्रामीण पाणी पुरवठा योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरित करुन न घेतल्यामुळे त्या नाईलाजाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास चालवाव्या लागतात. त्यापैकी काही योजना सतत पाठपुरावा केल्यामुळे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी ताब्यात घेतल्या. परंतू योजना हस्तांतरित करीत असताना सदर योजनांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नियुक्त केलेला पूर्ण कर्मचारी वर्ग संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याकडे वर्ग करुन घेतला नाही.

ही कार्यक्रम बाब वरील प्रकारच्या कर्मचाऱ्यांमुळे उद्भवलेले प्रश्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अवगत करुन देण्यासाठी सादर केली असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, या संदर्भात १९९८ पासून शासनाचे मार्गदर्शन मागण्यात आले असून अद्यापपर्यंत याबाबत प्राधिकरणाने काय कार्यवाही करावी हे शासनाकडून कळविण्यात आलेले नाही. अहस्तांतरित कर्मचाऱ्यांच्या भवितव्या संदर्भात त्यामुळे प्रश्न निर्माण झाला असून कामगार/कर्मचारी संघटना देखील याबाबत सतत पाठपुरावा करीत आहेत व प्राधिकरणाचे धोरण काय आहे याबाबत लवकरात-लवकर निर्णय घ्यावा अशीही त्यांच्याकडून विचारणा करण्यात आल्याने दि.११/११/१९९९ रोजी प्राधिकरणाने एका परिपत्रकाव्दारे अंतरिम आदेश सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. प्राधिकरणाने नोव्हेंबर,१९९९ मध्ये काढलेल्या परिपत्रकानुसार अतिरिक्त कर्मचाऱ्यांकडून प्राधिकरणावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार न पडता कामे करुन घेण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर अंतरिम व्यवस्थेस मान्यता देण्यासाठी ही कार्यक्रम बाब सादर करण्यात आली असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले.

याबाबत मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी असे विचार मांडले की, ज्या नगरपालिका त्यांच्या योजना ताब्यात घेताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्या योजनांसाठी नेमणूक केलेले कर्मचारी हस्तांतरित करुन घेणार नाहीत अशा नगरपालिकांना योजना हस्तांतरित करुन

घेतल्यानंतर त्या योजनांसाठी कोणतीही नवीन भरती करण्यास परवानगी न देण्याचा विचार नगर विकास विभागाने करावा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास यापुढे एखादी योजना हस्तांतरित न झाल्याने ती चालवायची वेळ आली तर जे अतिरिक्त कर्मचारी आधीपासून उपलब्ध आहेत त्यांची सेवा असे पाणी पुरवठा केंद्र चालविण्यासाठी उपलब्ध करुन घ्यावी आणि कोणत्याही परिस्थितीत नवीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करु नये असे मा.मंत्री महोदयांनी सूचित केले.

वरील प्रमाणे चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने केलेल्या अंतरिम व्यवस्थेस प्राधिकरणाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र.१६:-प्राधिकरणामार्फत राबविण्यांत येणाऱ्या नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कामाकरिता लागणारे सिमेंट कंत्राटदाराने आणणेबाबत.**

प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेत उपस्थित केलेल्या मुद्यांवरील कार्यवाहीच्या अहवालावर चर्चा करीत असताना आजच्याच सभेत सर्व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी लागणारे सिमेंट कंत्राटदारासच आणण्यास परवानगी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असल्याने (कार्यक्रम बाब क्र.१६ बाबतची चर्चा त्याचवेळी झाली असल्याने) प्रस्तावित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

नागरी पाणी पुरवठा योजनांच्या या निर्णयानंतर मागविण्यात येणाऱ्या सर्व निविदांमध्ये योजनेसाठी लागणारे सिमेंट प्राधिकरणामार्फत न पुरविता ते यापुढे संबंधित कंत्राटदारानेच आणावे अशी अट घालावी. कंत्राटदाराने सिमेंट आणतांना आवश्यक ते आय.एस.आय.प्रमाणपत्र व प्रयोगशाळेतील चाचणी प्रमाणपत्र संबंधित कार्यकारी अभियंत्यांकडे सादर करण्याचे बंधनकारक करावे आणि कार्यकारी अभियंता यांनी सिमेंटचा दर्जा तपासून योग्य दर्जाचे सिमेंट कामावर वापरले जात आहे याची खात्री करावी. याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक ते आदेश देण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांना या ठरावाव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१७:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा योजनांसाठी भांडवली बाजारातून कर्जरोख्याव्दारे उभारलेला निधी व त्या अनुषंगाने होत असलेल्या कृतीचा अहवाल.**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करताना असे सांगितले की, शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास भांडवली बाजारातून रु.३५०० कोटी पर्यंतचा निधी योग्य

त्या मार्गांने आवश्यकतेनुसार टप्प्या-टप्प्याने उभारण्यास परवानगी दिली असून त्या अनुषंगाने आत्तापर्यंत कर्जरोखे मालिका १ (रु.२९९ कोटी), कर्जरोखे मालिका २ (रु.५३८.८७ कोटी), कर्जरोखे मालिका ३ (रु.८८.५० कोटी), कर्जरोखे मालिका ४ (रु.२४९.९९ कोटी) व कर्जरोखे मालिका ५ (रु.१६९.०९ कोटी) अन्वये एकूण रु.१३४५.४५ कोटी उभे करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी रु.१०० कोटी कर्ज रुपाने प्राप्त झाले आहेत. सदस्य सचिव(प्रशासन) यांनी या संदर्भात पुढे असेही सांगितले की, कर्जरोख्यांव्दारे उभारलेले मुद्दल व त्यावरील व्याजाच्या संपूर्ण परतफेडीची हमी शासनाने घेतलेली आहे. वर उल्लेख केलेल्या कर्जरोखे मालिका १ व २ साठी अशी अट होती की, सदर कर्जरोख्यापोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालमत्तेचे समन्यय्य गहाण( Equitable Mortgage) करणे आवश्यक आहे. ही मालमत्ता विश्वस्त संस्थेकडे समन्यय्य गहाण म्हणून ठेवणे आवश्यक आहे. सदर मालमत्ता समन्यय्य गहाण ठेवणेबाबत अद्याप कार्यवाही न झाल्यामुळे विश्वस्त करार होऊ शकलेला नाही व विश्वस्त करार झाल्याशिवाय त्रिपक्षीय करार करता येत नाही अशी अडचण निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे वर उल्लेख केलेला विश्वस्त करार व त्रिपक्षीय करार न झाल्याने अद्यापपर्यंत कर्जरोखे धारकांस कर्जरोखे दाखला देता आलेला नाही. तद्नंतर सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

<u>**ठराव :-**</u>

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाने आत्तापर्यंत उभारलेल्या कर्जरोख्यांसाठी व यापुढेही उभारल्या जाणाऱ्या कर्जरोख्यांसाठी त्रिपक्षीय करार व विश्वस्त करार अंतिम करण्यासाठी व प्राधिकरणाची मालमत्ता विश्वस्त संस्थेकडे गहाण ठेवण्यासाठी तसेच इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१८:-नवी मुंबई/नवी मुंबई महापालिका तसेच टेमघर पाणी पुरवठा केंद्राशी संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांचे भवितव्य.**

मुख्य अभियंता(को.वि.) यांनी प्रस्तुत प्रकरणांबाबत माहिती दिली की, या भागातील पाणी पुरवठा व्यवस्था दि.१ नोव्हेंबर,१९९९ रोजी नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतर केली असली तरी, या कामांवरील प्राधिकरणाच्या ५७ कर्मचाऱ्यांना नवी मुंबई महापालिकेने स्वीकारलेले नाही व आजवर या कर्मचाऱ्यांना वेतन भत्त्यापोटी सिडकोकडून जी रक्कम परतावा म्हणून मिळत होती, ती नोव्हेंबर,१९९९ पासून बंद झालेली आहे.

त्याचबरोबर त्यांनी अशीही कल्पना दिली की, टेमघर पाणी पुरवठा केंद्र, ठाणे महापालिका, भिवंडी व भाईंदर नगरपालिका यांच्या संयुक्त यंत्रणेकडे दि.१ मार्च,२००० पासून

....१९....

हस्तांतर करण्याचा निर्णय झालेला आहे. टेमघर पाणी पुरवठा केंद्राच्या कामाची देखभाल दुरुस्ती ६ वेगवेगळ्या ठेकेदारांकडून करण्यांत येत असून त्यांनी या कामासाठी लावलेल्या कर्मचाऱ्यांशिवाय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ७४ कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न हस्तांतरणाचे वेळी उद्‌भवणार आहे.

यापैकी सिडको/नवी मुंबई प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्मचारी तर,टेमघर पाणी पुरवठा केंद्रासंदर्भात ठेकेदारी यंत्रणेचे कर्मचारी कामगार न्यायालयांत गेले असल्याची माहितीही देण्यांत आली.

मा.अध्यक्षांच्या विचारणेवरुन मुख्य अभियंता(को.वि.) यांनी अशी माहिती दिली की, टेमघर पाणी पुरवठा केंद्राच्या देखभाल दुरुस्तीच्या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दरवर्षी सुमारे रु.२ कोटी महसुल इ.टी.पी.चार्जेसव्दारे मिळत आहेत.

त्यावर अध्यक्ष महोदयांनी नवी मुंबई महापालिका/सिडको यांच्याशी संबंधित प्रकरणी राज्यमंत्री,नगर विकास यांनी त्यांचे स्तरावर सर्व संबंधित यंत्रणांची बैठक बोलावून यातून मार्ग निघू शकतो काय हे पहावे, अशी सूचना दिली. मात्र सर्व पाणी पुरवठा केंद्रे हस्तांतर करण्याचे शासनाचे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे धोरण असल्याने, राज्य शासनाने आदेश दिल्यास टेमघर पाणी पुरवठा केंद्राचे हस्तांतर करावे लागेल असा अभिप्राय अध्यक्ष महोदयांनी व्यक्त केला.

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ ) यांनी बैठकीत असे नजरेस आणले की, या कार्यक्रम बाबीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांमध्ये , अन्य मार्गांनी प्रश्न न सुटल्यास त्या कर्मचाऱ्यांची सेवा खंडीत करण्याचा (रिट्रेंचमेंट) विचार करावा असा उल्लेख केला आहे. प्रस्तुत प्रकरणी आजच या संदर्भात काही निर्णय व्हावा अशी अपेक्षा नसून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उच्च स्तरावर या प्रकरणांची कल्पना असावी म्हणजे त्या अनुषंगाने धोरण ठरविणे शक्य होईल या मर्यादित हेतूने ही कार्यक्रम बाब सादर करण्यांत आली आहे असेही त्यांनी सांगितले.

## वसई–विरार भागांतील पाणी पुरवठयाशी संबंधित बाबी.

चर्चे अखेरीस पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांनी, मुख्य अभियंता(को.वि.) यांना अशी सूचना केली की,वसई-विरार भागातील पिण्याच्या पाण्याचा जो प्रश्न आहे त्याबाबतही या बैठकीत माहिती करुन दयावी. त्यानुसार मुख्य अभियंता(को.वि.) यांनी पुढील माहिती दिली:-

वसई-विरार या फक्त २ नगरपालिका क्षेत्रासाठी रोजी २० द.ल.लिटर्स पाणी पुरविण्यासाठी रु.४१ कोटींची एक योजना हाती घेण्यांत आली. तथापी, प्रत्यक्षांत या २ नगरपालिका क्षेत्राबाहेर पाण्याची गरज अधिक असल्याने व काही दिवसांनी या भागांत नालासोपारा व नवघर या दोन नगरपालिकांची निर्मिती झाल्याने, त्यांनी या योजनेतून आपणांस पाणी मिळावे म्हणून अशी मागणी केली व ती शासनाने मान्य केली.

या योजनेसाठी अद्याप रु.१४ कोटी.६६ लाख रुपये कर्ज उपलब्ध व्हावयाचे असून, हे कर्ज उपलब्ध करुन देण्यास मुंबई महानगर विकास प्राधिकरण अनुकूल आहे. तथापी, अद्याप करार होऊ न प्रत्यक्षांत रक्कम उपलब्ध झालेली नाही. परिणामी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्वत:च्या निधीतून खर्च केलेली रु.९ कोटी,९० लाख रक्कम अडकून राहिलेली आहे.

प्रथमत: या भागातील वाढीव गरजांसाठी १०० द.ल.लिटर्स पाणी पुरविणारी सूर्या धरणावर आधारित रु.२०० कोटी रुपयांची एक योजना आखण्यांत आली. तथापी, निधी अभावी या यंत्रणेस प्रशासकीय मान्यता देता आली नाही.

या भागाचा विकास करण्याची जबाबदारी सिडकोवर असल्याने, ही योजना मार्गी लावण्याचे सिडकोने ठरविले व त्यातील शहराच्या वेशीपर्यंत प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपांगांचा समावेश असणाऱ्या सुमारे रु.१०० कोटी किंमतीच्या पहिल्या भागाची जबाबदारी सिडकोने स्वीकारली आहे. त्यास मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून निधी उपलब्ध होत असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण 'एजन्सी तत्वावर' हे काम करीत आहे. या कामासाठी रु.५९ कोटी निधी प्राप्त असून सुमारे रु.५५ कोटी खर्च झालेला आहे. ही योजना आणखी दीड वर्षात पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, यापुढे हे काम करण्यासाठी सिडको उत्सुक नाही असे दिसून आले आहे. तेंव्हा या कामाची जबाबदारी कोण घेणार, या योजनेचे मालक कोण, आणि निधी कोण उपलब्ध करुन देणार, हा प्रश्न निर्माण झालेला आहे.

शिवाय, जलकुंभ व वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण झाल्याशिवाय १ ला टप्पा पूर्ण होऊनही त्याव्दारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा वापर करता येणार नाही. म्हणून वितरण व्यवस्थेच्या कामाची सुमारे रु.२३५ कोटी किंमतीची टप्पा-२ योजना तयार केली असून, ती शासानास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केली आहे. ही योजना दोन भागात करणे प्रस्तावित असून त्यातील किमान आवश्यक कामांची (भाग-१) किंमत सुमारे रु.१५५ कोटी आहे.

मात्र या चारही नगरपालिका याबाबतची कोणतीही आर्थिक जबाबदारी घेण्यास तयार नाहीत असे दिसते. अशा परिस्थितीत टप्पा-१ साठी सुध्दा मुंबई महानगर विकास प्राधिकरण अधिक निधी उपलब्ध करुन देण्यास अनुत्सुक आहे असे दिसते.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१९:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नागपूर स्थित कार्यालयीन संकुलाच्या बांधकामाच्या सुधारित किंमतीस मंजुरी देणेबाबत....**

सदस्य सचिव(प्रशासन) यांनी या कार्यक्रम बाबी संदर्भात अशी माहिती दिली की, प्राधिकरणाच्या दि.१२/३/१९९७ रोजी झालेल्या ७१ व्या सभेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या

नागपूर येथील कार्यालयीन संकुलाच्या बांधकामाच्या रु.२,३९,१६,०००/- किंमतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आल्यानंतर त्या अनुषंगाने कार्यवाही चालू करण्यात आली. सदर कार्यालयीन संकुलाचे काम जवळ-जवळ संपले असून मुख्य अभियंता,नागपूर, कार्यकारी अभियंता,विभाग क्र.१ व २,नागपूर, यांची कार्यालये देखील या दोन विभागांशी संलग्न असलेल्या उप विभागीय कार्यालये/तांत्रिक पथके यांच्यासह सप्टेंबर,१९९९ पासून क्रमाक्रमाने नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात आली आहेत. सदर संकुलाचे बांधकामावर आत्तापर्यंत रु.२,३७,९३,६५२/- खर्च करण्यात आला असून,मार्च १९९९ अखेर पर्यंत संकुलाचे काम पूर्ण करण्यासाठी आणखी सुमारे रु.४५ लाख खर्च येणार आहे.

सदर खर्च वाढण्याची मुख्य कारणे खालीलप्रमाणे असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले.

१) व्ही.आर.सी.ई.,नागपूर, या महाविद्यालयातील वास्तुशिल्प शाखेने केलेल्या संकल्पनेमुळे चटई क्षेत्रात १०% वाढ झाली.

२) बांधकामाचे स्ट्रक्चरल संकल्पन हे भूकंप झोन क्र.३ वर आधारित करावे लागल्यामुळे सलोह कॉँक्रीटचे परिमाणात वाढ झाली.

३) मूळ प्रस्तावात विद्युतीकरणासाठी ढोबळ तरतूद होती. प्रत्यक्ष काम करताना मात्र वास्तुशिल्प नियोजनानुसार त्यात वाढ झाली. शिवाय महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने त्यांच्या नियमानुसार मीटर रुम तयार करणे ,विद्युत जोडणीसाठी अतिरिक्त आकार भरणे या मागण्या केल्यामुळे खर्चात वाढ झाली.

४) प्राधिकरणाच्या मालकीच्या ज्या जमिनींवर इमारत संकुलनाचे बांधकाम करण्यात आले आहे ती जमिन उंच सखल होती व त्यामुळे प्लॉट डेव्हलपमेंटसाठी अतिरिक्त खर्च करावा लागला आहे.

वरीलप्रमाणे सविस्तर माहिती सादर केल्यानंतर प्राधिकरणाने या कामाच्या रु.२,८३,००,०००/- खर्चाच्या सुधारित अंदाजपत्रकांस व मूळ मंजुर किंमतीपेक्षा रु.४३,८४,०००/- जास्त खर्चाच्या प्रस्तावास मान्यता दिली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नागपूर स्थित कार्यालय संकुलाच्या बांधकामाच्या मूळ प्रस्तावास रु.२,३९,१६,०००/- किंमतीला प्राधिकरणाच्या दि.१२/३/९७ रोजी झालेल्या ७१ व्या सभेत मंजुरी प्रदान करण्यात आली असून त्यानुसार हे बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहेत. उपरोक्त बांधकामावर एकूण रु.२,८३,००,०००/- खर्च होणार आहे व हा खर्च मंजूर किंमतीपेक्षा रु.४३,८४,०००/- ने जास्त आहे. उपरोक्त खर्च कार्यालयीन संकुलात संपूर्ण सोयी उपलब्ध

करणेकरिता आवश्यक असल्यामुळे रु.२,८३,००,०००/- च्या सुधारित खर्चाच्या प्रस्तावास या ठरावाव्दारे मंजुरी देण्यांत येत आहे. वर उल्लेखलेल्या संकुलाचे बांधकामाचे सर्व अधिकार , नियमांचे अधिन राहून, सदस्य सचिव(तांत्रिक) यांना देण्यात येत आहे.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.२०:-सन १९९९-२००० मध्ये चालू व नवीन नागरी पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून योजनांतर्गत कर्ज उभारणी.**

प्रगतीपथावरील २१ तर २२ नवीन नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून १९९९-२००० या वर्षात अनुक्रमे रु.२९१२.१४ लाख व रु. ४७६१.०८ लाख असा एकूण रु.७६७३.२२ लाख कर्जाचा प्रस्ताव सादर करण्यास परवानगी देण्यासाठी ही कार्यक्रम बाब सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. १९९९-२००० या आर्थिक वर्षात नियोजन विभागाने एकूण रु.५५०० लाख इतके नियतव्यय कर्ज उभारणीसाठी मंजूर केले आहे. परंतु आयुर्विमा महामंडळाकडून स्लायडिंग स्केल वर कर्ज मंजुर होत असल्याने रु.७६७३.२२ लाखाचा प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले. या कर्जाच्या उभारणी संबंधात आयुर्विमा महामंडळाशी करावयाचा करार करण्यासाठी सदस्य सचिव(प्रशासन)/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत करण्यासाठी सदर कार्यक्रम बाब सादर करण्यात आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

ठराव करण्यात येतो की, आयुर्विमा महामंडळाकडून प्रगतीपथावरील २१ व नवीन २२ नागरी पाणी पुरवठा/ जलनि:सारण योजनांसाठी रु.५५०० लाख कर्ज उभारणी, आयुर्विमा महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार करण्यास व प्राधिकरणाची सामान्य मुद्रा (Common Seal) वापरुन आयुर्विमा महामंडळास करारनामा सादर करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे प्रस्तावित सर्व कार्यक्रम बाबींवर तसेच आयत्या वेळच्या कार्यक्रम बाबींवर चर्चा झाल्यानंतर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. मा.मंत्री महोदयांनी देखील त्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपली असे घोषित करण्यात आले.